# सोलापूर महानगरपालिका,सोलापूर

इंद्रभुवन आंबेडकर चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१

बांधकाम परवाना विभाग, नगर रचना कार्यालय, दुसरा मजला

ई-मेल : adtpsolapur1@gmail.com


जा.क्र.ससंनर/बां.प./२४/१५८ दि. ०९/०५/२०२४

मा. सादर

**विषय :-** मान्सुन पुर्व जाहिर प्रसिध्दीकरण करणे बाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन पावसाळयाच्या अनुषंगाने शहरातील कमकुवत, जीर्ण तथा धोकादायक इमारती तसेच इलेक्ट्रीक पोल व झाडे पडून होणाऱ्या जिवित व वित्तहानी होऊ नये म्हणून शहरातील नागरीकांमध्ये सुरक्षिततेतच्या अनुषंगाने घ्यावयाच्या काळजी बाबत आवाहन करणे बाबतचे प्रसिध्दीकरणाचा मसुदा सोबत जोडलेला आहे. सदर मसुदयावर स्वाक्षरी होऊन सदरचे प्रसिध्दीकरण स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी व प्रसिध्दीकरणाचा खर्च "दौंडया व जाहिराती" सदरी खर्ची टाकणेस मान्यता मिळणेस विनंती आहे. तसेच सदरचे प्रसिध्दीकरण म.न.पा.चे वेबसाईटवर देखील प्रसिध्दीकरण करणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

सोबत - प्रसिध्दीकरणाचा मसुदा

Sd/- 3/5/2024

सहा.संचालक, नगर रचना
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

Sd/- 03.05.2024

मा. आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

E:\draft\Pangal Sir 2023\dhokadayak

## जाहिर प्रसिध्दीकरण

पावसाळयाच्या दिवसांत वादळीवारे व पावसामुळे शहरातील जुनी आणि कुमकुवत घरे / चाळी इमारती पावसाच्या माऱ्यामुळे पडण्याची शक्यता असते. तसेच झाडे, इलेक्ट्रीकल पोल इत्यादी कोसळण्याची शक्यता असते. अशा धोक्यामुळे जिवीत व वित्त हानी संभवते. सदर बाबी टाळणेसाठी खालीलप्रमाणे खबरदारी नागरीकांनी घ्यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये आपल्या इमारतीची वेळोवेळी तज्ञ इंजिनिअरकडून पाहणी करवून घेऊन इमारत अथवा इमारतीचा प्रत्येक भाग सुस्थितीत राखण्याची जबाबदारी संबंधीत घर मालकांनी / भोगवटदारांनी पाहणीनुसार आवश्यक पाडकाम स्वत: करुन घेणे अथवा दुरुस्त्या महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेऊन करणे आवश्यक आहे. तसेच धोकादायक इमारती मधील रहिवाशांनी अशा इमारतीमधून स्थलांतरीत होऊन सुरक्षित ठिकाणी रहिवास करणे बाबत देखील याद्वारे आवाहन करण्यात येत आहे.

यापूर्वी महानगरपालिकेकडून शहरातील ३० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेल्या इमारतीचे रचनात्मक स्थैर्य प्रमाणपत्र (Structural Stability) महानगरपालिकेकडील नोंदणीकृत रचनाकार अभियंता यांचेकडून तपासणी करुन घेऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व शासनाच्या मंजुर एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मध्ये २.१.७ Repairs to Building तरतुद असुन सदर तरतुदीप्रमाणे सोलापूर महानगरपालिकेस कळवून परवाना धारक आर्की./ला.इंजि./स्ट्रक्चरल इंजि. यांच्या देखरेखीखाली आवश्यकतेप्रमाणे धोकादायक भागाची दुरुस्ती करुन घ्यावी. नोंदणीकृत स्ट्रक्चरल इंजिनिअर/परवाना धारक इंजि. यांची यादी बांधकाम परवानगी विभागाकडे नागरीकांकरीता उपलब्ध करण्यात आलेली आहे.

एखाद्या इमारतीचा भाग अचानक कोसळल्यास झाडे, पोल, इत्यादी पडल्यास अग्निशामक दल फोन नं.२७४०३६४ व ६८, १०१, नगर अभियंता स्टोअर - ०२१७-२७४०३३५, या कार्यालयांना नागरीकांनी त्वरीत कळवावे.

तरी सर्व घर मालकांनी भोगवटदारांनी व नागरीकांनी पावसाळयात इमारती झाडे व इलेक्ट्रीकल पोल पासून होणारा संभाव्य धोका टाळण्यास आणि जिवीत व वित्तहानी होऊ न देण्यास सोलापूर महानगरपालिकेस सहकार्य करावे.

03.05.2024

शीतल तेली-उगले, भा.प्र.से.
आयुक्त,
सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

O/C

E:\draft\Pangal Sir 2023\dhokadayak